साप्रवि/शि.नि./दवसु/अनुसूचि-ग/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
शिस्तभंग कारवाई कक्ष
"प्रकाशगड" ४था मजला
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड,बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१

महावितरण

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक : ३९ दिनांक २१/४/२००६

म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियमाला जोडलेल्या अनुसूची 'ग' मध्ये कंपनीच्या कर्मचा-यांविरुध्दच्या शिस्तभंग कारवाईच्या प्रकरणांमध्ये कर्मचा-यांना शिक्षा देण्यासाठी व अपिलांवर निर्णय घेण्यासाठी असलेले सक्षम अधिकारी विहित केले आहेत. सदर अनुसूचित नमूद केलेले सक्षम अधिकारी हे सर्वसाधारणतः संवर्गनिहाय नमूद केलेले आहेत. जसे की, तांत्रिक पदे, लेखा पदे, सामान्य प्रशासन विभागातील पदे, कामगार व औद्योगिक संबंध शाखा, वैद्यकीय, दक्षता व सुरक्षा संवर्गातील पदे इत्यादी. त्या त्या संवर्गातील कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंग कारवाई करण्यासाठी त्या त्या संवर्गातील अधिकारी हे सक्षम अधिकारी म्हणून विहित केलेले आहेत.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, दक्षता व सुरक्षा संचालनालयातंर्गत स्थापित केलेली फिरती पथके (Flying Squads) ही क्षेत्रिय कार्यालयात कार्यरत असून या फिरत्या पथकात दक्षता व सुरक्षा संवर्गातील कर्मचा-याव्यतिरिक्त इतर संवर्गातील कर्मचारी सुध्दा कार्यरत असून या फिरत्या पथकाचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण संचालक(दवसु) यांचेकडे आहे.

मात्र या फिरत्या पथकातील दक्षता व सुरक्षा संवर्गाव्यतिरिक्त इतर पदांवरील कर्मचा-यांनी फिरत्या पथकात कार्यरत असतांना गैरकृत्य केले असल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंग कारवाई कोणी करावी असा प्रश्न उपस्थित झाला होता.

या अनुषंगाने केलेल्या परिक्षणाअंती असे निदर्शनास येते की, ही फिरती पथके दक्षता व सुरक्षा संचालनालयातंर्गत कार्यरत असून ती संचालक(दवसु) यांच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणातंर्गत कार्यरत आहेत ही बाब विचारात घेवून या फिरत्या पथकातील कर्मचा-यांनी फिरत्या पथकात कार्यरत असतांना गैरकृत्य केले असल्यास त्यांच्या विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याकरिता सेवाविनियमाला जोडलेल्या अनुसूची 'ग' मध्ये खालील अनुक्रमांकाचा अंतर्भाव (Add) करुन सक्षम अधिकारी विहित करण्यात येत आहेत.

| अनुसूची 'ग' मध्ये अंतर्भाव करावयाचा अनुक्रमांक | कर्मचा-याचा प्रवर्ग | सक्षम अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी (प्रथम अपील प्राधिका-याने दुस-या अपिलास परवानगी दिल्यास) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २ (चार) (अ) | फिरत्या पथकातील वेतनगट - १ मधील कर्मचारी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) | संचालक(दवसु) | संचालक (मानव संसाधन) | व्यवस्थापकीय संचालक |
| ३ (तीन) (अ) | फिरत्या पथकाला संलग्न (attached to Flying Squad) असलेले वेतनगट -२ मधील कर्मचारी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) | संबंधित परिक्षेत्राचे उप संचालक (द,सुवअं) | संचालक(दवसु) | संचालक (मानव संसाधन) |
| ४ (चार) (अ) | फिरत्या पथकाला संलग्न (attached to Flying Squad) असलेले वेतनगट -३ मधील कर्मचारी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) | फिरत्या पथकाचा प्रमुख अधिकारी (वेतनगट १ पेक्षा कमी दर्जाचा नसावा) | संबंधित परिक्षेत्राचे उप संचालक (द,सुवअं) | संचालक(दवसु) |

हे परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक(महावितरण) यांनी संचालक(वित्त) व संचालक(संचलन) यांच्याशी विचारविनियम करुन मान्यता दिल्याने काढण्यात येत आहे.

मुख्य महाव्यवस्थापक(कव)

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालयाच्या स्तरापर्यंत